पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८.
वैद्यकीय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/१४३अ/कावि/४८५/२०१६
दिनांक - ०४/०८/२०१६

**विषय - धन्वंतरी स्वास्थ्य योजना अंमलबजावणीबाबत ...**
**संदर्भ** - धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३.

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आली आहे.

त्यानुसार योजना सुरु झालेपासून मनपा कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक धन्वंतरी योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत. माहे जुन २०१६ अखेर धन्वंतरी योजनेमध्ये उपचार घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक यांची संख्या ४५६० इतकी असून त्यासाठी रु.१८,५३,९४,२०४.०० रकमेची बिले प्राप्त झाली आहेत.

तथापि योजना सुरु झालेनंतर योजनेमधून आवश्यक व योग्य तेच उपचार घेण्याऐवजी योजनेचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ती कर्मचा-यांमध्ये वाढीस लागली आहे. अनावश्यक उपचार घेणे, थंडी-ताप, पोट दुखणे, जुलाब, गॅस्ट्रीक, डोक दुखणे, अशक्तपणा, जनरल विकनेस अशा किरकोळ कारणांसाठी अॅडमिट होतात. काही कर्मचारी विविध प्रकारच्या तपासण्या करणेचे अनुषंगाने अॅडमिट होतात. तसेच काही कर्मचारी कोणत्याही प्रकारची पुर्व सूचना न देता, वैद्यकीय अधिका-यांची परवानगी न घेता मोठ्या व खर्चीक शस्त्रक्रीया करुन घेत आहेत. त्यामुळे धन्वंतरी योजनेचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत चालला आहे. याचा विचार करता योजनेचा अनावश्यक खर्च कमी करणेसाठी उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.

धन्वंतरी योजना ही महापालिका कर्मचा-यांचे वैद्यकीय उपचारांसाठी वरदान असून कर्मचा-यांस कोणत्याही अटी/शर्ती शिवाय योजनेचे पॅनलमधील रुग्णालयांमधून परिपुर्ण उपचार करणेत येत आहेत. तथापि धन्वंतरी निधीचा योग्य विनियोग होण्यासाठी व खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी किमान अटी/शर्ती आवश्यक आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनलवरील रुग्णालयात उपचार घेणेस रुग्णालयात दाखल होणेपुर्वी वैकल्पिक स्वरुपाच्या सर्व शस्त्रक्रीयांकरीता महानगरपालिकेच्या रुग्णालयातुन रेफरशिट घेऊनच उपचार करणे आवश्यक आहे.

२) तातडीचे उपचारासाठी सदरची अट लागू राहणार नाही. तथापि सदरचे उपचार तातडीचे असल्याचे सिध्द करणे ही संबंधित कर्मचा-याची जबाबदारी राहील. तसेच वैद्यकीय विभागातील तज्ञ डॉक्टर्स बिलाची तपासणी करुन उपचाराची तातडी ठरवतील. अन्यथा अशा उपचारांची बिले कर्मचा-यांना स्वत: अदा करवी लागतील.

३) धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनलवरील रुग्णालयात आवश्यकता नसतानाही अॅडमिट करुन घेण्यासाठी दंगामस्ती करुन जबरदस्ती केल्यास अशा कर्मचा-यांवर विभागामार्फत गंभीर प्रशासकीय कारवाई करणेत येईल.

४) आवश्यकता नसताना पॅनलवरील रुग्णालयाने अनैतिकपणे कर्मचा-यास अॅडमिट करुन घेतल्यास सदरचे रुग्णालय पॅनलवरुन काढून टाकणेत येईल. व रुग्णालयास काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच संबंधित कर्मचा-यावर प्रशासकीय कारवाई करणेत येईल.

५) धन्वंतरी योजनेचे सभासद अधिकारी/कर्मचारी यांचे पती/पत्नी हे इतर कोणत्याही शासकीय/निमशासकीय/अथवा खाजगी संस्थेमध्ये कामाला असतील व त्यांनी योजनेमधील रुग्णालयात उपचार घेतलेस अशा अधिकारी/कर्मचा-यास त्यांचे पती/पत्नीचे कार्यालयाचा ना हरकत दाखला बिलासोबत सादर करावा लागेल अन्यथा बिल मंजुर केले जाणार नाही.

६) धन्वंतरी योजनेचे सभासद अधिकारी/कर्मचारी यांचे पती अथवा पत्नी कोणत्याही शासकीय/निमशासकीय/अथवा खाजगी संस्थेमध्ये कामाला नाहीत अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी असा दाखला एकदाच देणे आवश्यक राहील.

७) अधिकारी/कर्मचा-याने पॅनलवरील रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर त्याचे उपचाराच्या रुग्णालयाकडून आलेल्या बिलाची पडताळणी केल्यानंतर सदरचे उपचार ओपीडी स्वरुपातील आजाराचे असल्याचे आढळून आल्यास सदरचे बिल अदा केले जाणार नाही. ते संबंधित अधिकारी/कर्मचारी/सेवानिवृत्त यांना अदा करावे लागेल.

८) अधिकारी/कर्मचारी तसेच रुग्णाने पॅनलचे रुग्णालयात सॉफ्टवेअरचे माध्यमातुन ओळख पटवूनच उपचार घेणेत यावेत. ॲडमिशनचे वेळी अधिकारी/कर्मचारी व रुग्णाचा फोन/मोबाईल क्रमांक, निवासाचा पत्ता देण्यात यावा. डिसचार्ज झाल्यानंतर उपचारांचे बिलाची पडताळणी करुन रुग्णावर केलेले उपचार योग्य व बरोबर असल्याची खात्री करुन तशी बिलावर स्वाक्षरी करणेत यावी.

९) सेवानिलंबित/दिर्घ मुदतीचे वैद्यकीय रजेवर असलेल्या व धन्वंतरी योजनेचे सभासदत्व न स्विकारलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना धन्वंतरी योजनेचा लाभ होणेसाठी त्यांची माहिती धन्वंतरी कक्षाकडे सादर करणेत यावी. तसेच ज्यांना वेतन अदा केले जात नाही. अशा अधिकारी/कर्मचारी यांनी प्रत्येक महिन्याचे १० तारखेपर्यंत त्यांचे हिशाची रक्कम मनपा कोषागारात भरुन त्याची पावती आपले विभागात व विभागामार्फत धन्वंतरी कक्षाकडे सादर करावी.

१०) ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे मुला/मुलींची लग्न झालेली आहेत. किंवा त्यांना स्थायी रोजगार मिळाला आहे. त्यांनी आपले सदर मुला/मुलींची नावे योजनेतुन कमी करुन घ्यावीत व तसे त्वरीत धन्वंतरी कक्षास कळवावे.

११) तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निसंदिग्धपणे चेतावणी देण्यात येते की, त्यांनी आस्थापना लिपीक/वरिष्ठ लिपीक यांचेकडे जाऊन आपली व आपल्या कुटुंबाची नावे धन्वंतरीचे विंडोवर दिसत असल्याची खात्री करुन घ्यावी., दिसत नसल्यास लिपीकाकडून पुर्तता करुन घ्यावी. लिपीकाकडून प्रतिसाद न मिळाल्यास शाखाप्रमुखांकडे समक्ष लेखी तक्रार करावी. सदरची कार्यवाही दि. १५/०८/२०१६ पर्यंत पुर्ण करणेत यावी. त्यानंतर कोणत्याही कर्मचा-याची माहिती तातडीचे उपचाराचे कारणास्तव रजिस्टर केली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घेणेत यावी.

१२) सर्व शाखाप्रमुखांनी आपले विभागाकडील सर्व कर्मचा-यांची माहिती धन्वंतरी योजनेमध्ये रजिस्टर करणेत आली असून एकाही कर्मचा-याची माहिती धन्वंतरी योजनेमध्ये रजिस्टर करावयाची राहिलेली नाही. अशा आशयाचा दाखला दि.२०/०८/२०१६ पर्यंत वैद्यकीय विभागात जमा करणेत यावा. मुदतीमध्ये पत्र/दाखला प्राप्त न झाल्यास अशा विभागांची ऑगस्टची पगारबिले लेखा विभागाकडूनस्विकारली जाणार नाहीत. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

धन्वंतरी समितीच्या दिनांक ०४/०६/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उपरोक्त नमूद मुद्यांवर सविस्तर चर्चा करुन वरीलप्रमाणे कार्यवाही करणेच्या सूचना प्राप्त असल्याने या सूचनांप्रमाणे सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करुन धन्वंतरी योजने अंतर्गत आवश्यक व योग्य तेच उपचार घेण्यात यावेत. व कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची खबरदारी घेणत यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.

प्रति,
सर्व संबंधित शाखाप्रमुख
विभाग